Exh.26

रे. क. नं. ११/२०२६

**मे. दिवाणी न्यायाधिशसो, क. स्तर, राधानगरी**

**यांचे कोर्टात...**

१. श्री. प्रविण नामदेव ढवण वगैरे ८ ........ वादी

विरूध्द

१. श्री. प्रल्हाद बाबुराव ढवण वगैरे ६ ......... प्रतिवादी

यातील वादीतर्फे साक्षीदार यांचे

निशाणी ५ ऐवजी अॅफिडेव्हीट

Order-
Seen and filed.
Sd/-
Jt.C.J.J.D.,Radhanagari.
Dt. 8/4/2026

**अॅफिडेव्हीट**

मी यातील वादीतर्फे साक्षीदार श्री. कृष्णा दिनकर रानमाळे व. व. ५५, धंदाः शेती, रा. मांगेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर देवाची शपथ घेवून अॅफिडेव्हीट करतो की,

१. मला वादी, प्रतिवादी माहितीचे आहेत. तसेच मौजे नरतवडे, येथील गट नं. ५०२, ५०३, ५०४, ५०५, ५०६, ५०७ हया सर्व जमीनी माहितीच्या आहेत. माझी आमचे वडीलांचे नावची एकत्र कुंटूंबाची गट नं. ४३९ मौजे नरतवडे येथील जमीन सदर जमीनीच्या बांधाला बांध लागून उत्तर बाजूला असून ती आम्ही स्वतः कसतो.

Assistant Suprintendent

२. वर नमुद केलेल्या गट नं. ५०२ ते ५०७ या जमीनीचे एकूण क्षेत्र २९.५ गुंठे असून ती जमीन प्रविण नामदेव ढवण, महेश नामदेव ढवण, एकनाथ आत्माराम ढवण, दामोदार आत्माराम ढवण, बळवंत आत्माराम ढवण, अशोक दिनकर ढवण, प्रकाश दिनकर ढवण व विलास शंकर ढवण हे सर्व स्वतः कष्ट मशागत करून गेले ५० वर्षापासून कसत असलेची मला प्रत्यक्ष माहिती आहे. आमचे वडीलांचेकडून त्यापूर्वीपासूनच वरील सर्व लोक जमीन कसत असलेचे वडीलांनी आम्हाला सांगितलेले आहे. सदर जमीनीमध्ये ऊस व भात अशी पिके वादी घेत आहेत याची मला प्रत्यक्ष माहिती आहे. आमचे जमीनीत देखील आम्ही ऊस व भात अशीच पिके घेत आहोत.

३. वर नमुद केलेल्या जमीनीशी प्रतिवादी नं. १ ते ५ यांचा कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्कसंबंध नाही. सदर जमीनीमध्ये त्यांची कधीही वहिवाट नव्हती अगर नाही.

४. गट नं. ५०४ व ५०५ मधील अडीच गुंठे क्षेत्र तुकाराम कृष्णा गायकवाड यांचेकडे खरेदीने मालकी वहिवाटीला आहे. सदरचा हिस्सा त्यांनी विलास शंकर ढवण यांचेकडून खरेदी केलेला आहे.

म्हणून केले ॲफिडेव्हीट असे.

कृष्णा दिनकर रानमाळे

राधानगरी

ता. १०.०३.२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

(ॲड. डी. एम. पोतदार)

Assistant Suprintendent.

## <u>प्रतिज्ञा</u>

मी यातील वादीतर्फे साक्षीदार श्री. कृष्णा दिनकर रानमाळे व. व. ५५, धंदाः शेती, रा. मांगेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील नमुद ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी

ता. १०.०३.२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. Krishana Dinkar Ranmale.
Age 55 Occu. Agri
R. Mangewadi Tal: Radhanagari
Who identified by Shri./Smt. D.M. Pardar
Adv. Whom I Know personally
Dated 10/3/2026
Assistant Superintendent